20-21
Conf.

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-57

## Index


| SR. NO. | AUTHOR NAME | PAGE.NO. |
|---|---|---|
| 101 | नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या शैक्षणिक प्रगतीचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>*डॉ. श्रीनिवास नरहरी पिलगुलवार* | 605-614 |
| 102 | वनविषयक कायदे व आदिवासी<br>*डॉ. डी. जी. म्हशाखेत्री* | 615-620 |
| 103 | समकालीन भारतातील आदिवासी चळवळी<br>*डॉ. नागसेन नामदेव मेश्राम* | 621-629 |
| 104 | आदिवासी समाजातील लिंगभाव असमानता आणि आरोग्य प्रश्न<br>*डॉ. कविता दि. मुनेश्वर* | 630-633 |
| 105 | आदिवासी समाजातील सामाजिक आंदोलने व परिवर्तन<br>*प्रा. डॉ. कमलाकर पी. तागडे* | 634-642 |
| 106 | आदिवासी समाजातील बालकामगारांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुका)<br>*प्रा. डॉ. गजेंद्र माणिकराव कढव* | 643-650 |
| 107 | आदिवासींच्या विकासासाठी शासनाचे प्रयत्न<br>*प्रा. डॉ. दिपक एम. सुखदेवे* | 651-656 |
| 108 | आदिवासींची सामाजिक संरचना : प्रश्न आणि उपाय<br>*डॉ. चंद्रकांत ध. कांबळे* | 657-666 |
| 109 | आदिवासी समाजातील स्त्रियांच्या आरोग्याची समस्या<br>*डॉ. विलास चव्हाण* | 667-670 |
| 110 | आदिवासी स्त्री समस्या<br>*प्रा. रीता द. वाळके* | 671-673 |
| 111 | आदिवासींचे कुपोषण – एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार* | 674-680 |


M.G. Arts, Science & late N.P. Commerce College, Armori

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# आदिवासी समाजातील बालकामगारांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुका)

**प्रा. डॉ. गजेंद्र माणिकराव कढव**

*समाजशास्त्र विभागप्रमुख, महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी*

*९९२२१८९९८२ gajendrakadhav@gmail.com*

**सारांश**

*भारतीय समाजाचे विभाजन हे केवळ शहरी समाज आणि ग्रामीण समाज याच प्रकारे केले जाते परंतु असे विभाजन करतांना एका महत्वाच्या समाजाकडे दुर्लक्ष केले जाते. तो म्हणजे रानोवनात, डोंगरदर्यात राहणारा आदिवासी समाज होय. २०११ जनगणनेनुसार भारतामध्ये ८.६१ टक्के लोकसंख्या ही आदिवासी लोकांची आहे. त्यात महाराष्ट्रात ९.३५ टक्के असून गडचिरोली जिल्ह्यात त्यांचे प्रमाण ३८.१७ टक्के आहे. आज भारतातील आदिवासी समाजाला नवनवीन समस्यांचे ग्रहण लागले आहे. त्या तिलच एक समस्या म्हणजे आदिवासी समाजातील बालकामगारांची समस्या होय.*

*आदिवासी समाजातील गरिबी, बेरोजगारी, अतिरिक्त लोकसंख्या वाढ, परंपरागत व्यवसाय इ. कारणांनी त्या समाजात बालकामगारांची समस्या समोर आली आहे. आज आदिवासी समाजात बालकामगारांची आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि लैंगिक पिळवणूक स्पष्ट पणे दिसून येत आहे. जी एक कर्ती पिढी गारद करीत आहे. आदिवासी समाजातील बालकामगार समस्या एक देशातील ज्वलंत समस्या असून या समस्येचे निराकरण करणे गरजेचे आहे.*

*मुख्य शब्द : आदिवासी, ज्वलंत, बालकामगार, गारद, लोकसंख्या, ग्रहण, पिळवणूक, मानसिक, लैंगिक*

**प्रस्तावना** : संत तुकाराम महाराज यांनी 'लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा॥' असे बालपणाचे माहात्म्य सांगितले आहे.बालपण, लहानपण हे नाव घेताच आपल्याला ओसंडून वाहणारा आनंद, उत्साह, उलडपणा, मस्ती, खेळकर आणि खोडकर प्रवृत्ती या गोष्टी सहज नजरे समोर येतात. परंतु असे बालपण आणि लहानपण काही मोजक्याच बालकांच्या आयुष्यात येतात. जगात असे असंख्य बालक आहेत जे या आनंदापासून वंचित राहिले आहे, त्यांच्या नशिबात लहानपणापासून कष्ट करणे, गलीच्छ परिस्थितीत राहणे त्यांच्या वाट्याला आले आहे. ते म्हणजे बालकामगार होय.१ बालकामगार हा इतर कामगारांपेक्षा कमी मजुरीत काम करणारा कामगार असल्याने तसेच ठराविक वेळेपेक्षा कमी मजुरीत जास्त काम करून देत असल्याने मालक वर्गांकडून या कामगाराची मोठी मागणी असते. जे वय शिकण्याच आणि खेळण्याच असते त्या वयात त्यांच्या श्रमाची विक्री होत असते. चिमुकले हात कष्ट करणारे होत असल्याने त्यांचे गोंडस, गोजिरवाणे बालपण गुलामगिरीच्या विळख्यात सापडते.२भारतामध्ये प्रत्येकच समाजात बालकामगार मोठ्याप्रमाणात आढळून येतात. जे देशाच्या विकासाला अडथला निर्माण करत आहे.भारतामध्ये ओरिसा, बिहार, झारखंड, या राज्यामध्ये बालकामगारांचे प्रमाण जास्त प्रमाणात असल्याचे दिसते.३ महाराष्ट्रात देखील मराठवाडा, विदर्भ या क्षेत्रात बालकामगारांची संख्या जास्त असल्याचे दिसते. विदर्भातील



M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★Armori★

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli